

अभिसरण

ISSN-2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक
डॉ. गणेश मोहिते

सहसंपादक
डॉ. मनोहर सिरसाट

| | | | |
|---|---|---|---|
| २० | 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न | डॉ. एम.ए.कव्हळे | १०१ |
| २१ | कृषिव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'या पराधलंबी दिवसात' | डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे | १०४ |
| २२ | साहित्यकृती आणि चित्रपट निर्मिती | प्रा.डॉ.धोंडगे एम.बी.<br>कांदे केशव अंगदराव | १०९ |
| २३ | चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना | डॉ. सुनीता अंबादास बोराडे | ११२ |
| २४ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेला दिशा देणारी कविता: पिढीपेस्तरप्यादेमात | प्रा.बाळू मोहन तिखे | ११६ |
| २५ | "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव" | प्रा. संदीप परदेशी | १२० |
| २६ | लोककला तमाशाचे बदलते स्वरूप | तुकाराम हरिश्चंद्र देवकर<br>प्रो. एम. बी. धोंडगे | १२४ |
| २७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा | प्रा. लक्ष्मण गित्ते | १२७ |
| २८ | स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन | कैलास मच्छिंद्रनाथ होके<br>प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव | १३१ |
| २९ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी दलित कथा | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | १३६ |
| ३० | 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी' (विशेष संदर्भ : 'साखरफेरा') | प्रा. महारूद्र सूर्यभान जगताप | १४२ |
| ३१ | दलित जाणिवा शब्दांकित करणारी निर्स्गार्कीत कविता : मोहाडी | प्रा.डॉ.प्रल्हाद दत्तराव भोपे | १४६ |
| ३२ | प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक | प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट | १५२ |
| ३३ | मानवी प्राक्तन शब्दबद्ध करणारी कविता- काळी माती निळे आभाळ | डॉ. गणेश मोहिते | १५५ |
| ३४ | मार्ग कादंबरीतील पर्यावरणवादी विचार | प्रा.सौ. विलिना इनामदार | १६० |
| ३५ | "1990 नंतरच्या कथेचा अभ्यास" | प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे | १६९ |
| ३६ | मोतीराज राठोड यांच्या वैचारिक साहित्यातील विमुक्तांचे जीवनमूल्ये | डॉ. आकाश ब. पवार | १७४ |

# प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक

**प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट**
पदवी – पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्र प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड.

कवीवर्य प्रा. वामन निंबाळकर हे दलित साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य असे नाव आहे. दलित वाङ्मयाच्या प्रारंभीच्या काळातील प्रचंड प्रतिभा असणारे, मानवतावादी दृष्टीकोन घेऊन माणसांच्या स्वातंत्र्याचा उद्गार आपल्या साहित्याच्या माध्यमातून उजागर करणारे लेखक, विचारवंत, कवी, समीक्षक आणि कथाकार म्हणून सर्वपरिचित असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे कवीवर्य प्रा. वामन निंबाळकर हे होत. आपल्या लेखनाच्या प्रारंभापासूनच भूमिका घेऊन लेखन करणारे आणि त्या भूमिकेपासून जराही बाजूला न सरणारे, प्रसंगी त्या भूमिकांसाठी वाटेल ती किंमत मोजणारे प्रा. वामन निंबाळकर हे ठाशिव स्वरूपात आपल्या लेखनातून अभिव्यक्त होतात. वंचित, उपेक्षित, कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्त्व करीत, त्यांच्या दुःखांना वाचा फोडीत त्यांनी आपले समग्र साहित्य निर्माण केले आहे.

साठोत्तरी साहित्य प्रवाहातील दलित साहित्य प्रवाहाने जो आशय मांडला, त्यामुळे मराठी साहित्य विश्वाला हादरे बसले. जो आशय आजपर्यंत साहित्याचा विषय होऊ शकला नव्हता, तो दलित साहित्य प्रवाहाने साहित्यात अवतिर्ण करून मराठी साहित्याला अधिक समृद्ध केले. व्यापक केले. त्यामुळे साहित्याचा परिघ अधिक विस्तारला. दलित साहित्य प्रवाहामध्ये सुरवातीच्या काळात प्रचंड ताकदीच्या कविता प्रसृत झाल्या. त्यासोबतच कथा आणि आत्मकथांनी नंतरचा काळ अधिक बहरला. सशक्त आशयासह कथा - आत्मकथा दलित साहित्य प्रवाहात दाखल झाल्या आणि संबंध मराठी साहित्यच ढवळून निघाले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेऊन १९७०-८० च्या दशकात अनेक प्रतिभावंत लेखकांनी आपल्या साहित्यकृतींमधून मानवमुक्तीचा आशय शब्दबद्ध केला. त्यामध्ये बाबुराव बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ, शंकरराव खरात, केशव मेश्राम, वामन निंबाळकर यासारख्या प्रतिभावंतांनी आपल्या कवितेने सत्तरचे दशक हादरवून सोडले. एकूणच मराठी कवितेच्या इतिहासालाच नवा आयाम देण्याचे काम त्यांनी आपल्या कवितेतून केले. गावकुसाबाहेरील कवितेने वामन निंबाळकर यांना कवीवर्य म्हणून मान्यता मिळाली. यानंतरच्या काळात आणखी दोन कविता संग्रहांनी ही मान्यता अधिक व्यापक झाली. वामन निंबाळकरांच्या माय, शब्द यासारख्या कविता त्यांच्या प्रचंड प्रतिभेची प्रचिती देणाऱ्या अशा आहेत.

कवितेबरोबरच वामन निंबाळकरांनी तितक्याच ताकदीने कथा साहित्याची निर्मिती केली. वाचकांना प्रचंड अस्वस्थ करणाऱ्या आणि भारतीय समाजव्यवस्थेकडे डोळसपणे पाहण्याचे नवे भान देणाऱ्या कथांमुळे कथाकार म्हणूनही वामन निंबाळकरांचे व्यक्तिमत्त्व दलित साहित्य चळवळीत अग्रभागी राहिले आहे. 'माणूस' केंद्रवर्ती ठेवून त्याला प्रतिष्ठित करू पाहणारी निंबाळकरांची कथा उपेक्षित-वंचित माणसांच्या व्यथा-वेदनांचा हुंकार ठरली आहे. मराठी साहित्यातील सातशे वर्षांच्या इतिहासात उपेक्षितांचे अंतरंग उलगडले गेले नाही. याउलट वर्णव्यवस्था अधिक भक्कम करण्याचे काम झाले. आदिवासी एकलव्याने आपल्या महत्त्वाकांक्षेपोटी स्वतःच्या कर्तबगारीने, कौशल्याने आणि कष्टाने मिळविलेले धुर्विद्येतील प्राविण्य क्षत्रिय पांडवांचे गुरू द्रोणाचार्य यांना पाहवले नाही. या ठिकाणी ही फक्त क्षत्रियाला शस्त्र धारण करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी गुरूदक्षिणा मागून कपटकारस्थानाने आदिवासी एकलव्याचा उजव्या हाताचा अंगठा कसा कापून घेतला ही कथा चातुवर्ण्यव्यवस्थेचे पालन करणारी आणि हीच व्यवस्था अधिक योग्य आहे, हे सांगणारी व्यवस्था अधिक प्रबळ करण्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. वामन निंबाळकर यांचा 'असाही एकलव्य' हा कथा संग्रह अधिक महत्त्वपूर्ण वाटतो.

साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. मात्र आतापर्यंतच्या साहित्यात उमटणारे प्रतिबिंब हे पूर्ण समाजाचे नव्हते. वंचित, कष्टकरी समूहाच्या व्यथा-वेदना, त्यांचे भावविश्व, त्यांचे जीवनमान यांचे प्रतिबिंब दूरदूरपर्यंत दिसत नव्हते. मात्र दलित साहित्य चळवळीने ही वेदना अंतःकरणपूर्वक साहित्याचा अविभाज्य भाग केली. प्रा. वामन निंबाळकर यांच्या 'असाही एकलव्य' या कथेतील प्रत्येक कथा याचा प्रत्यय देणारी आहे. या कथासंग्रहात एकूण नऊ कथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या नऊही कथांमधून वंचित, उपेक्षित माणूस, त्याची प्रतिष्ठा, त्याचे भावविश्व, त्यांचे श्रम यांविषयीचा आशय अभिव्यक्त होताना दिसतो. स्वाभिमान, विद्रोह, प्रस्थापित व्यवस्थेने अमानवी पातळीवरील केलेला वर्तनव्यवहार, संघर्षशील मानसिकता आणि त्याला तितक्याच ताकदीने दिलेला नकार ह्या बाबी या संग्रहातील अनेक कथांमधून पहावयास मिळतात. स्फोटक आणि विद्रोही स्वरूपातील अत्यंत धारदार अशी मांडणी हे या संग्रहाचे वैशिष्ट्ये आहे. या कथासंग्रहातील कथांची शिर्षकेही तितकीच अर्थपूर्ण, प्रवाही आणि स्फोटक अशी आहेत. त्यामध्ये जखम, आवा, उन्हाळा, आग, पाऊस, इज्जत, लायसन्स, मुलाखत, असाही एकलव्य अशी शिर्षकांची योजना लेखकाने जाणिवपूर्वक केल्याचे लक्षात येते.

'असाही एकलव्य' या कथासंग्रहातील पहिलीच 'जखम' नावाची कथा वाचकांना प्रचंड अस्वस्थ करणारी आणि अंतर्मुख होऊन समाजव्यवस्थेने लादलेली प्रचंड गरीबी, दारिद्र्याचे दर्शन घडविणारी आहे. पांडाभाऊच्या वाट्याला आलेले प्रचंड दुःख, उपासमार, उपेक्षा आणि प्रचंड कष्ट करूनही पांडाचा अंत होणे हा अनुभव वाचतांना वाचकाच्या अंतःकरणात जखम झाल्याशिवाय रहात नाही. क्रूर वेदनादायी असणाऱ्या अनुभवांनाही लेखक प्रा. वामन निंबाळकरांनी शब्दबद्ध करतांना त्या अनुभवातील गांभीर्य जपत त्यातील दुःख करूणेच्या पातळीवर नेले आहे. 'जखम' कथेतील माय, अन्सी हा व्यक्तिरेखा म्हणजे गरीबीतील संघर्षाचे दुसरी नावे आहेत. प्रचंड संघर्ष करून एवढ्या दारिद्र्यातही शिक्षणाची असणारी पांडाभाऊची ओढही प्रेरणादायी अशीच आहे.

'आवा' कथेतील 'आवा' हे पात्र तर मानवतावादाचा पुरस्कार करणारे असेच आहे. या कथेचा नायक आवा हा आंबेडकरी गावाचा मार्गदर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा बसविण्याच्या घटनेत आवाने गावात निर्माण झालेला संघर्ष तर मिटवलाच शिवाय बाबासाहेबांचे विचार आणि कार्यही गावाच्या पाटलासह सर्वांना समजावून सांगितले. गावावर आलेले मोठे संकट मोठ्या हिंमतीने आवाने हाताळून त्याचे आनंदात रूपांतर केले. स्वतःचा जीव धोक्यात घालून सुभानचा वाचविलेला जीव, पावसामुळे गावावर आलेले भयानक संकट यासारख्या घटनांमधून आवा खरे नायक म्हणून या कथेत उभे रहतात. आवाच्या व्यक्तिमत्त्वातील शौर्य, धैर्य, शांतपणा, चांगुलपणा, माणुसकी हे मूल्य स्विकारून आपले जगणे सुंदर करता येते हा या कथेतून आलेला विचार खूपच महत्त्वाचा वाटतो. रक्ताचे नाते नसतांनाही संपूर्ण गावाचा होणारा आवा आणि आवाचे संपूर्ण गाव हे नवे नाते आपल्या वर्तनामुळेच निर्माण होऊ शकते हा आशयही या कथेतून लेखकाने वाचकांसमोर ठेवला आहे.

'आग' कथा ही चारित्र्याची जपवणूक करणारी शेवंताची कथा आहे. लेखकाने शेवंताच्या जन्माची कथा सांगत तिने आपले तारूण्य कसे जपले, आपल्या शीलाला कसे जपले आणि सोन्या पाटलाला धडा शिकवायचा म्हणून त्याचा केलेला अंत विद्रोही मूल्ये असणारी ही कथा आहे. या कथेतील धाडसी, निर्भीड आणि तितकीच करारी बाण्याची शेवंता उभी करण्यात लेखकाला यश आले आहे. खलनायकी वृत्तीचा सोन्या पाटलाचा अंत वाचकाला सुखावून जाणारा आहे. त्यासोबतच गरीबीतही आपले चारित्र्य जपणारी, त्याचे रक्षण करणारी आणि प्रसंगी दोन हात करून आपल्यावर होत असणाऱ्या अन्यायाला वाचा फोडीत सोन्या पाटलाचाच अंत करणारी निर्भया शेवंताची व्यक्तिरेखा अधिक ठळक स्वरूपात या कथेतून आली आहे

आजच्या शिक्षणव्यवस्थेतील काही शिक्षकाचे असभ्य वर्तन आणि त्या परिस्थितीला न जुमानता गुणवत्तेत अव्वल असणारी कुसूम 'पाऊस' या कथेत चित्रित झाली आहे. कुसूमने अगदी जिद्दीने मॅट्रीक

होऊन शिक्षण पूर्ण केले आणि नोकरी मिळविली. स्वतःच्या कर्तृत्वाने आपण जीवनात यशस्वी होऊ शकतो, हा या कथेतून आलेला विचार सर्वच विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरणारा असाच आहे.

वामन निंबाळकर यांच्या सर्वच कथा ह्या मानवकेंद्री आहेत. माणसाला प्रतिष्ठा देऊ पाहणाऱ्या आहेत. म्हणूनच त्यांच्या कथेतील नायकही अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा, स्वाभिमानी आणि कणखरबाण्याचे आहेत. स्वतःच्या तत्त्वनीला जपतांना कुठल्याही तडजोड न करणारे नायक आदर्शवत वाटणारे आहेत. म्हणूनच लेखक प्रा. वामन निंबाळकर हे मानवमुक्तीचा ध्यास घेतलेले कथाकार म्हणून मोठे लेखक वाटतात. त्यांच्या कथांनी वंचित, उपेक्षित, कष्टकरी समूहाला दिशा देण्याचे, जगण्याचे तत्त्वज्ञान देण्याचे काम केले आहे. त्यांच्या कथांमधून येणारी भाषा ही अत्यंत सघन, साधी आणि आकलनास सोपी वाटावी अशी आहे. त्यामुळेच त्यांची कथा वाचकांच्या अंत:करणापर्यंत पोहचते. म्हणूनच प्रा. वामन निंबाळकर मोठे कथाकार वाटतात.